RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक १६] सोमवार, ऑगस्ट १७, २०२६/श्रावण २६, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक २१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### नगर विकास विभाग

मंत्रालय, ४ था मजला (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ ऑगस्ट, २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३७६/नवि-१७.— ज्याअर्थी, श्रीमती बैतुलबी बिन्ते अ करीमखा (विवाहानंतर बदललेले नाव बतुलबी शेख हुसेन कुरेशी), यांनी वर्ष २०२५ मध्ये झालेल्या जामनेर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका लढवल्या होत्या आणि त्यांची प्रभाग क्र. ७ अ मधून 'नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग' या राखीव जागेवर नगरसेवक म्हणून निवड झाली होती ;

आणि ज्याअर्थी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जळगाव यांनी दिनांक ५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या त्यांच्या आदेशाद्वारे श्रीमती बैतुलबी बिन्ते अ करीमखा (विवाहानंतर बदललेले नाव बतुलबी शेख हुसेन कुरेशी), यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवून ते रद्द केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम १६ (१-क) अन्वये जिल्हाधिकारी, जळगांव यांनी त्यांच्या दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती बैतुलबी बिन्ते अ करीमखा (विवाहानंतर बदललेले नाव बतुलबी शेख हुसेन कुरेशी), यांना अनर्ह ठरविण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम १६ च्या पोट-कलम (१क) मधील खंड (अ) अन्वये श्रीमती बैतुलबी बिन्ते अ करीमखा (विवाहानंतर बदललेले नाव बतुलबी शेख हुसेन कुरेशी), हे नगरसेवक पदासाठी अपात्र ठरल्यामुळे, त्यांचे नगरसेवक पद रिक्त झाले आहे ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम १६ च्या पोट-कलम (१क) मधील खंड (ब) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्यासंबंधीच्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे श्रीमती बैतुलबी बिन्ते अ करीमखा (विवाहानंतर बदललेले नाव बतुलबी शेख हुसेन कुरेशी), यांना दिनांक ५ ऑगस्ट २०२६ पासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी नगरसेवक म्हणून निवडून येण्यास किंवा नगरसेवक पदावर राहण्यास अपात्र ठरवीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विद्या हम्पय्या,**
शासनाच्या सह सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya , 4th Floor (Main Building), Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, dated the 17th August, 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.

No. MUM-2026/C.R.376/UD-17.— Whereas Smt. Baitulbi Binte A karimkha (name changed after marriage to Batulbi Shaikh Hussain Qureshi) has contested the general elections of the Jamner Municipal Council held in the year 2025 and was declared elected as a Councillor from Ward No. 7 A on a seat reserved for the person belonging to Backward Class of Citizens ;

And whereas, the District Caste Certificate Scrutiny Committee, Jalgaon has *vide* its Order dated the 05th August 2026 declared the Caste Certificate of Smt. Baitulbi Binte A karimkha (name changed after marriage to Batulbi Shaikh Hussain Qureshi), as invalid and cancelled the same;

And whereas, District Collector, Jalgaon, has disqualified Smt. Baitulbi Binte A. Karimkha (name changed after marriage to Batulbi Shaikh Hussain Qureshi) *vide* his order dated 11th August 2026 under clause Section 16(1-c) of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), the ;

And whereas, Smt. Baitulbi Binte A karimkha (name changed after marriage to Batulbi Shaikh Hussain Qureshi) having been disqualified for being a Councillor under clause (a) of sub-section (*1C*) of section 16 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), her seat as such Councillor have become vacant ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (b) of sub-section (*1C*) of section 16 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby disqualifies Smt. Baitulbi Binte A karimkha (name changed after marriage to Batulbi Shaikh Hussain Qureshi) for being elected or being a Councillor for a period of six years from the 05th August 2026.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIDYA HAMPAYYA,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.